
साहित्य संस्कृती प्रकाशन
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू
जुलै २०१४
अनाहत

# अनुक्रमणिका


एकटा ....................................................................................४

FLIGHT MH370... ...................................................................६

ऊसतोड आणि कोयत्या.............................................................८

शर्यत .....................................................................................११

बा ,वेड्या खुळ्या मना....... ....................................................१३

स्वप्नांच गाव..........................................................................१७

जगतोय शहरात मी ..................................................................१९

स्वप्नांचे असंख्य वेताळ.............................................................२०

क्षुल्लक वाटत आहे....................................................................२२

पुस्तक ....................................................................................२४

पान्हा......................................................................................२५

असं आहे मग..........................................................................२६

एकांत ....................................................................................२८



साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

# अनाहत जुलै २०१४

नमस्कार रसिकहो.

I have nothing to say, I am saying it & that is poetry. —..John Cage

ही व्याख्या सार्थ करणाऱ्या काहीही सांगायचं नसलेलं सगळं काही सांगतानाच गुंगवून ठेवणाऱ्या काही अनाहत· कविता घेऊन आलो आहोत. त्यांचा आस्वाद घ्या अन् मनमोकळा प्रतिसाद द्या.



# एकटा

मी वृक्ष उभा डोहाच्या ऐन्याकाठी
खांद्यावर वाहत अगणित हसरी घरटी
कल्लोळ जगाचा तिऱ्हाईतसा बघतो
ही एकटी व्यथा लपवत हास्यापाठी

आलीस मुळांशी थकून विझल्या पायी
मध्यान्ह उतरली गहिऱ्या डोळ्यांठायी
रस्त्याचा अवघ्या भार, नकोसे जगणे
वसलीस सुखाने क्षणभर छायेपाई

आभास दिलासे हळवे पेरत गेला
भेटीचा अपुल्या मीही उत्सव केला
वरवरचा लागे स्वर जो आतापावे
तळ खोल तुझ्या मायेने भिजवत नेला

दोघांचे सुकले अश्रू घावहि भरले
कण ओलाव्याचे जगणे व्यापुन उरले
इतक्यात कुठूनी हाक मारली कोणी
निमिषात संपली सोबत कधी न कळले

स्थिर अचल उभा मी अन् तू एक प्रवासी
ती संगत सरून गेली त्याच क्षणाशी
निर्ममसे सत्य न उमजू येते मजला

मौनात ढाळतो अजुन फुलांच्या राशी

**-- अमेय पंडित**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## Flight MH370...

कुठे जातोय
काय होणारेय
माहित नसताना
बदललेली दिशा

अणि मग ...

एक हुंकार
शब्दहीन
नादहीन
मृत्यूचा

एक जखम
खोलवर ...
पण
लाल रंगाऐवजी
ओघळ आले
काळे

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

तो काळा रंग ...

न असण्याचा

शेवटच्या श्वासाचा

शब्दहीन

नादहीन

रंगहीन रंग

अजून ओघळतोच आहे ...

**-अशोक डोंगरे**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## ऊसतोड आणि कोयत्या

दारी आलाया टरक
बांधा बाचके-बोचके
ऊसतोडीचं कुतरं
तोडे सुखाचे लचके

थकलेले मायबाप
सोडा निराधार घरी
लेक ठिवला शिकाया
धोंडा ठेवुनिया उरी

कुण्या जनमाचा शाप
आली भटकंती पायी
ऊस तोडला नाही त
वर्स भागणार नाही

सहा महिने ढोरकाम
सहा महिने ऐशपाणी
पैसा रगत-घामाचा
गमावला पाण्यावाणी

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

ऊन-थंडी-पावसाचं
सकाळीच उठायचं
कोयत्यानं रानभर
आता ऊस तोडायचं

देवबाप्पा उगेस्तोर
काम घाम-घाम काढी
वीतभर पोटासाठी
किती करायची राडी ?

कारखान्याची उचल
गेली हुंड्यातच सारी
एक लेक गावाकडं
एक संग फेडीसाठी

कच्चं मडकं पोरगी
शिकू द्याया हवं होतं
तिला हक्काचं बालपण
जगू द्याया हवं होतं

जगा साखर मिळते
आम्हा कोयत्यांच्यामुळे

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

शिक्षितांना गोड पेढा
आम्हा अज्ञानाची  फळे

कधी उमगला नाही
आम्हा जगण्याचा अर्थ
भूक-पोट, हाव-पैसा
सारा अनर्थ-अनर्थ

ढोर होऊन खपावं
दर पिढीनं असचं
जग चंद्रावरी गेलं
आम्हा एकच : ऊसचं
- किशोर मोतिराम भागवत

# शर्यत

शर्यतीत आयुष्याच्या
पाऊल पाऊल धावतांना
दोन मैल सोबत तुझ्या
चालण्याचे राहून गेले.

जगायचे होते आपल्याला .
काही आयुष्य माझे, आणि काही तुझे..
माझेच जगत राहिलो,
तुझे मात्र, जगायचेच राहिले.

मध्यांतरी आयुष्याच्या
नसलेली शिदोरी शोधत राहिलो
अर्धपोटी आयुष्य
तसेच  तुडवत राहिलो,

रुतलो  दलदलीत ही  अन्
उन्हात कडक होरपळलो
दाट तुझ्या छायेपासून
दूर- दूर धावत राहिलो.

जड झालीत आता पाऊले

कधी उभा, कधी पडलो

दोन घटका विसावण्याचे तुझ्यात

कळत नकळत, का टाळत राहिलो.. ?

**..अनुपम.**

(डॉ . शुभू खैरनार -खैरे, वोरीकशायर  इंग्लंड )

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## बा ,वेड्या खुळया मना.......

बा,वेड्या,खुळया मना असा कसा रे तू

सांग ना,कुण्या मुशीतून घडलास तू....

गृहितच धरणे,धुत्कारले,झिडकारले जाणे,हेच तव प्रारब्धी

तेजोभंग,मानभंग,अपेक्षाभंग,लिहिलेत आजन्म तव
माथी.....

पचविलेस अपार दुख्ख,साहिल्यास अनंत वेदना

त्यागून त्यास ऊभा, राहिलास पुन्हा पुन्हा....

चांगुलपणाचा तुझ्या घेतलाय,मतलबी दुनियेने फायदा

हेतु पुरस्सर विसरला,केलेला तुझ्याशी वायदा....

केला तुझा केवळ,स्वार्थासाठीच वापर

वरूनी फोडले दोषांचे,तुझ्याच माथी खापर....

कायम धडपडायचास तू,ऊंच भरारी घेण्यास

पंखच छाटल्या गेलेत,चौकटीतील आयुष्य जगण्यास....

तुझी ऊर्जा,प्रतिभा सळसळे,असाध्य ते साध्य करण्यास

पायच ओढलेत सदा,धेय्यापासून परावृत्त करण्यास....

खेळणे समजून तुज, दूर दूर भिरकावले

तरीहि तू त्यांच्याचसाठी,कां देवाजवळ प्रार्थिले...?

मानसिक,शारिरीक,भावनिक दुख्खाचा,अंतरी असुनहि लाव्हा

कसा राखतोस तू,मनी आनंदाचा अमृत ठेवा....

निस्वार्थीपणे सदा केला,मदतीचाच पुढे हात

कपटी जगाने केला,कायमच घोर विश्वासघात...

जरी करितो तू,फक्त दुसर्यांचाच विचार

तरीहि तुला दूर लोटण्याचा,कां करतात लोक अविचार...?

किती वादळे,त्सुनामी आल्यात तव जीवनी

रक्ताळलास,भेगाळलास,ठेचाळलास,उध्वस्त झालास मनोमनी...

गर्दीत अन एकांतीही,उरला एकाकी एकटा

अंतरीच्या कळा दाबत,संसार करतोय नेटका...

एवढे सोसुनही ना तक्रार,ना तुझा त्रागा

पूर्णसुखी भासतो या जगा,असुनही बापुडा अभागा...

बा मना,ऐक माझे,राहू नकोस सज्जन

सदा तोंडघशी पडणे,हेच तुझे प्राक्तन...

स्वार्थी जगाकडून बोध घेना काहीतरी

जशास तसे तंत्र वापरून,हो तू पक्का व्यवहारी...

मला नाही वाटत,जमेल तुला असे वागणे

तुझा स्वभावच नाही मुळी,पुढच्याचे मन दुखावणे...

माहित आहे मज,नाकारशील मम  सल्ल्याला

कारण तुझे वागणे राहील सदा, येरे माझ्या मागल्या...

मग बैस रडत,कुथत,दुख्ख भोगत,जगाच्या लाथा खात

विषाची परीक्षा पाहत,जगाला आजमावत,अन् दुनियादारी निभावत....

ऊघडतील केंव्हा तुझे डोळे,सावर रे स्वत;ला, सल्ला माझा मानित

ऐकणार नसशीलना माझे, मग येऊ नकोस ,मजकडे तू अश्रु ढाळीत...

**सौ.वर्षा किडे कुळकर्णी.**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

# स्वप्नांच गाव

का जुन्या स्वप्नांचा हात सोडून
आपण पुढे निघून जातो
आपण पुढे जातो
स्वप्नांचा गाव मागे राहतो
मग कधीतरी आपणच सजवलेल्या
त्या गावात आपण पुन्हा पाय ठेवतो
पण आपलाच तो गाव
आपल्याला परका वाटू लागतो
आपणच सजवलेला तो एक एक खेळ
मग लहानग्यांच्या भातुकलीच्या खेळा इतका
खुळा वाटू लागतो
पण तरीही क्षणभर का होईना
तो खेळ पुन्हा जगावा वाटतो
पण काही केल्या त्या जुन्या खेळात
आता गुंतता येत नाही
पुन्हा जुन्या स्वप्नांत आता हरवता येत नाही
मग वाटत
हीच का ती स्वप्न ज्यात आपण हरवलो होतो
त्याच का त्या स्वप्नासोबत
आपण क्षण अन क्षण जगलो होतो

विश्वास ठेवण तस जरा कठीणच होत
पण याही प्रश्नच उत्तर आपल्याकडेच असत

जुन्या त्या स्वप्नांची जागा
आपल्याच नव्या स्वप्नांनी घेतलेली असते

आणि आपणच नकळत आपल्या
जुन्या सोबत्यांची सोबत सोडलेली असते
म्हणूनच
आपल्याच जुन्या स्वप्नांचा गाव
आपल्यासाठी परका असतो
आणि आपल्याच त्या गावात
आपला मार्ग हरवलेला असतो

**-जीवनिका**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## जगतोय शहरात मी

जगतोय शहरात मी
कॉंक्रिटच्या जंगलात मी
मानवाच्या पसाऱ्यात मी
प्रोफिटच्या हव्यासात मी
सुबत्तेच्या पाठीला  मी.

हरवतोय का माणुसकी मी

मनात परी शोधतोय मी

विस्तीर्ण, गावचा शिवार मी

गारवा पहाट चा मी

शिरवा पाऊस थेंबाचा मी

चांदण्यातली  रात मी.
माणसात माणूस मी

**-प्रफुल्ल पाठक**

## स्वप्नांचे असंख्य वेताळ

प्रेमाच्या रिसेशनकाळात
हे चालू संवत्सर
घेतेय वदवून माझ्या तोंडून
बेरोजगार हृदयाचे व्याकरण

उण्यापुऱ्या सव्वादोन तपात
टच करून गेलेत कित्येक संन्यास
आपल्या इवल्याशा वर्तुळाला स्पर्शिकेसारखे

अज्ञानाचे लघुकोन, विशालकोन होत गेले
वाढत गेले तृष्णेच्या कणांचे वस्तुमान
आयुष्याचे हे गतिमान अवमूल्यन

आपण सेलिब्रेट करत राहीलो सालोसाल
वाईनच्या डोहात पोहून मनसोक्त
थकून भूक लागल्यावर खोदावेत

फिश-फ्रायचे पर्वत
जीभेच्या चवचाल जे.सी.बी.ने
अशा विचित्र इच्छांची वस्ती
उतरलीये आयुष्याच्या शहरात

जागेपणाच्या वटवृक्षावर
लटकून बसलेत स्वप्नांचे असंख्य वेताळ
तेच आलटून पालटून शेअर करताहेत
विक्रमाची मासूम पाठ

गेलेल्या गद्दार दशकात
छाटून टाकले गेलेय
विचारसरणीचे हात पाय डोके
आणि आजच्या मेजवानीत
'खुर-मुंडी'चा बेत असल्याची बातमी आहे

**-.सत्यपालसिंग आधारसिंग राजपूत**

## क्षुल्लक वाटत आहे

खूप दिले आहेस मला तू, अजून मागत आहे
एका शाश्वत होकाराची आशा ठेवत आहे

येणे-जाणे तुझे नेहमी चकवत असते मजला
वेड्यागत मी तुझी अजुनही चाहुल शोधत आहे

एका दिवसामधल्या साऱ्या सेकंदांची संख्या
रोज तुझ्या येणाऱ्या स्मरणांसोबत बदलत आहे

आनंदाने जगणे आता सोपे झाले आहे
तुझ्याच आनंदामध्ये मी माझा पाहत आहे

तुझ्याएवढे सोबत कोणी कधीच नव्हते माझ्या
नसण्याची सोबत आहे, असण्याची सोबत आहे

नका वाचवू, बुडु द्या, हे तर बुडणेही भाग्याचे!
अमुच्यामधल्या नात्याचा या तळ मी गाठत आहे

तुला मिळू दे प्रेम सोबती, सुख- समृद्धी-शांती

'मिळावीस तू मला' - ध्यास हा, क्षुल्लक वाटत आहे

**- नचिकेत जोशी**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## पुस्तक

एक पुस्तक लिहावं, असा विचार करतो आहे

नाव 'तू'

हक्क तुझे
प्रस्तावना तुझी
मुखपृष्ठ तू
मलपृष्ठही तूच
आतला शब्दन् शब्द तुझाच
फक्त मनोगत माझं....

हे पुस्तक जगासाठी नसेल
फक्त आपल्यासाठी असेल
कारण खूप काही अव्यक्त राहिलंय
कारण खूप काही अव्यक्तच राहणार आहे

एक पुस्तक लिहिणार आहे
आठवांच्या पानांवर, आसवांच्या शाईने..

**-रसप**

## पान्हा

तुझ्या नपुंसक मर्यादा
ती सहज पदराखाली घेऊन वावरते तेव्हा,
तिच्या उदार स्त्रीत्वाचं कौतुक
करण्याची अपेक्षा तिला नसावीच..

खंबीरपणे सार्या त्रुटींच्या भेगा सांधत जाते तेव्हा,
नाजुकपणा गळून राकट झालेल्या चेहर्याला तू सुंदर म्हणावस,
अशीही अपेक्षा नसेल

जगण्यातला सगळा रखरखीतपणा
तिच्या कोरड्या डोळ्यात स्पष्ट दिसू लागेल आणि तरीही.....
तरीही, कधी एखादा हळवा चुकार शब्द फ़ोडेल तिचा पान्हा... !

त्या फुटलेल्या पान्ह्याने ओलावलेल्या पदराला मात्र हसू नकोस...
चुकूनही!
तुझ्या वृथा मर्दूमकीलाही तिने तिथेच थारा देऊ केलाय....

**-बागेश्री देशमुख**

## असं आहे मग

तर असं आहे की
कविता लिहितात कि करतात
या कन्फ्युजन मधेच
त्याने कविता लिहिल्या / केल्या (जे असेल ते )
अन रोज स्वतःच वाचायचा
स्वतःच करायचा समीक्षा
स्वतः चा साहित्य मुकादमी होता त्याच्याकडे
मस्त मजेत कुठेही लिहायचा/करायचा कविता
अन कविता असलेले कागद सोडायचा
शांतपणे नदीमध्ये होड्या करून
थंडी असली कि शेकोटी पेटवायला
तोच कागद घ्यायचा
ठसन ने म्हणायचा
मला गरज नाही असल्या पोकळ शब्दांची जगायला
शब्द नांगरून देत नाही की होत नाही यांनी आजार बरे
उडादो इन्हे ....... असं काहीतरी नशेत असला तर
अन तरी मजा येते म्हणून
त्याच कन्फ्युजन मध्ये लिहायचा/करायचा कविता
विचारलं तर म्हणायचा

ही ७ ० वर्षांची म्हातारी
अन ही ७ वर्षांची लेक
यांना जेव्हा त्याच तीव्रतेने समजेल एकच कविता
तेव्हा थांबू कविता लिहायला/करायला

**-प्रेषित**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

## एकांत

अंदमानातले काळे पाणी,

कोलूबेड्याहंटरकदान्न

सोबत तीव्र अपमानाचा overtime !

साम्राज्याचा उग्र दर्प अन
देशाने केलेली प्रेमळ उपेक्षा.......

असे सगळे, अन वरती थोडी

जयहिंदची जाळी !

अशा सगळ्या विषाणूजिवाणूंमध्येही,

काही काही रक्तांचे

cultural malnourishment कि काय ते झालेच नाही!

उलट,

तुरुंगाच्या अजस्त्र काळभिंतीही
त्यांच्या जहालहळव्या लेखणीने

cultured झाल्या!

मातृभूमीच्या मृत्युंजय विरोत्तमांसाठी,

.

..
दुसरं काय होता
एकांत म्हणजे तरी!

**-शिवकन्या**

साहित्य संस्कृती
संस्कृती,कला,जाणिवा जोडणारा सेतू

*प्रकाशक- साहित्यसंस्कृती प्रकाशन*
*[www.sahityasanskruti.com](http://www.sahityasanskruti.com)*
*संपादन- क्रांति साडेकर*
*मुखपृष्ठ छायाचित्र- सोनाली जोशी*
*मुखपृष्ठ -मयूर कुलकर्णी(atizmayur@gmail.com)*

*All rights reserved. No part of these poems can be published without the written consent of the poet/poetess.*

To submit your poems/ writing/join the team please send an email to-

eksakhee@gmail.com

anahatmagazine@gmail.com

Please like us on Facebook at

*www.facebook.com/sahityasanskruti*

*Thank You!*